# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

### परिपत्रक क्र. २०२/२०२१

**विषयः- प्रशासकीय सेवकांच्या वेतनाबाबत...**

शैक्षणिक विभागातील नियमित सेवक वगळता जे सेवक टिपणीद्वारे, रिटेनरशिपवर, रोजंदारी वर कार्यरत आहेत, अशा सेवकांचे मासिक वेतन विभागासाठी 'वेतन विनाअनुदानित' अशी तरतूद नसल्यामुळे विभागाच्या 'देखभाल दुरुस्ती व इतर खर्च' या अर्थशिर्षातून खर्ची टाकतात, असे निर्दशनास आले आहे. लेखा परीक्षणात याबाबत गंभीर आक्षेप नोंदवण्यात आले आहेत.

सर्व विभागप्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, आर्थिक वर्ष २०२१-२२ पासून वेतन खर्च आपल्या विभागाच्या देखभाल दुरुस्ती व इतर खर्च या अर्थशिर्षात खर्ची टाकण्यात येऊ नयेत. वेतन विना अनुदानित अशी विद्यापीठ निधी मधील तरतूद मधूनच सदर खर्च करण्यात यावा व तशी अर्थतरतूद नसल्यास अशा प्रकारच्या हंगामी सेवकांचे वेतन अदा करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सर्व संबंधितांनी या महत्वाच्या बदलाची नोंद घ्यावी व वित्त व लेखा विभागास सहकार्य करावे.

गणेशखिंड, पुणे-४११००७

**जा.क्र.:**वित्त/अर्थसंकल्प/२०२१-२२/६७८

**दिनांक :** ०६/०८/२०२१

**उप वित्त व लेखा अधिकारी**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग — सदर परिपत्रकाचा आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.

F:\Dr.Bhagwat\Marathi Letters